फक्त कार्यालयीन उपयोगाकरिता

जिल्हा सामाजिक व आर्थिक समालोचन

सिंधुदुर्ग जिल्हा

१९८६-८७

अर्थ व सांख्यिकी संचालनालय
महाराष्ट्र शासन
मुंबई

जिल्हा सामाजिक व आर्थिक समालोचन

सिंधुदुर्ग

सन १९८६-८७

जिल्हा सामाजिक व

अर्थ पक्षसांख्यिकी संचालनालय

महाराष्ट्र शासन

मुंबई

भाग - १

जिल्हा दृष्टीक्षेपात

पान १ ते ८

आर्थिक समालोचन

पान नं १ ते ४०

दृष्टीक्षेपात जिल्हा [वर्ष १९८६-८७]

जिल्हा - सिंधुदुर्ग

अ. क्र.	बा ब	परिमाण	जिल्हा	महाराष्ट्र
१.	२.	३.	४.	५.
[एक]	**प्राकृतिक रचना**			
	अ] भौगोलिक स्थान			
	१] उत्तर अक्षांश	अंश	१५.३७ ते १६.४०	१६.४ ते २२.१
	२] पूर्व रेखांश	अंश	७३.१९ ते ७४.१३	७२.६ ते ८०.९
	ब] हवामान			
	तपमान			
	१] किमान	सेल्सिअस	१७.१	उ.ना.
	२] कमाल	-"-	३३.२	उ.ना.
	३] पर्जन्य [सरासरी]	मि.मी.	२४४१	उ.ना.
	क] प्रशासकीय विभाग [१एप्रिल रोजी]			
	१] तालुके	संख्या	७	३०३
	२] पंचायत समित्या	-"-	७	२९८
	३] टंचाईग्रस्त तालुके	-"-	[१९८६-८७] ७	[१९८५-८६] १३०
	४] एकात्मिक ग्रामीण विकास प्रकल्प गट	-"-	७	२९८
	५] शहरे	-"-	४	३०७
	६] गावे [एकूण]	-"-	७०६	४१८३३
	१]निर्जण	-"-	१	२४७९
	२] वसती असलेली	-"-	७०५	३९३५४
	७] क्षेत्रफळ	चौ.कि.मी.	५०८७.५	३०७६९०
[दोन]	**प्रशासकीय संस्था**			
	१] पंचायत समित्या	संख्या	७	२९८
	२] महानगर पालिका	-"-	-	११
	३] नगर पालिका	-"-	३	२१६
	४] कटक मंडळे	-"-	-	७
	५] ग्रामपंचायती[३१-३-८७]	-"-	४००	२४७०७
	६] पोलिस स्थानके[१-३-८७]	-"-	८	७८४
	७] पोलिस आउट पोस्ट [१-३-८७]	-"-	२१	११९१

१.	२.	३.	४.	५.
[तीन]	लोकसंख्या [१९८१]			
	१] ग्रामीण लोकसंख्या	आकडे हजारात	७३०	४०७९१
	२] नागरी लोकसंख्या	—"—	५०	२१९९३
	३] एकूण लोकसंख्या	—"—	७८१	६२७८४
	४] अनुसूचित जातीची लोकसंख्या	—"—	३१	४४८०
	५] अनुसूचित जातीच्या लोकसंख्येची टक्केवारी	टक्केवारी	४.००	७.१४
	६] अनुसूचित जमातीची लोकसंख्या	आकडे हजारात	७	५७७२
	७] अनुसूचित जमातीच्या लोकसंख्येची टक्केवारी	टक्केवारी	०.८६	९.१९
	८] पुरूष	आकडे हजारात	३५४	३२४१५
	९] स्त्रिया	—"—	४२७	३०३६९
	१०] स्त्री-पुरूष प्रमाण	१००० पुरूषामागे स्त्रियांचे प्रमाण	१२०५	९३७
	११] घनता	दर चौ. कि.मी. क्षेत्रातील लोकसंख्या	१५४	२०४
	१२] साक्षरतेचे प्रमाण			
	१] एकूण	टक्केवारी	५४.००	४७.१८
	२] पुरूष	—"—	६६.१०	५८.७९
	३] स्त्रिया	—"—	४४.१०	३४.७९
	४] राज्यामध्ये जिल्ह्याचा क्रमांक	संख्या	०४	—
[चार]	कृषि [१९८५-८६] *			
	१] भौगोलिक क्षेत्र	हजार हेक्टर	५०५	३०७५८
	२] जंगल व्याप्त क्षेत्र व भौगोलिक क्षेत्राशी टक्केवारी	हजार हेक्टर [टक्केवारी]	३३ [६.५३]	५३५० [१७.३९]
	३] शेतीला उपलब्ध नसलेली जमीन [१९८५-८६]			
	अ] बिगर शेती वापरा खालील जमीन	हजार हेक्टर	१०	१०७९ *
	ब] पडीक आणि लागवडी लायक नसलेली जमीन	—"—	९९	१७१६
	क] एकूण	—"—	१०९	२७९५

१.	२.	३.	४.	५.
	४] पडीत जमिनी व्यतिरिक्त लागवड न केलेली इतर जमीन [१९८५-८६]			
	१] कायम गुरचरण आणि इतर	हजार हेक्टर	x	१५४७
	२] झाडे झुडपाखालील जमीन	–"–	१३	१७९
	३] लागवडी योग्य परंतु पड जमीन	–"–	१३८	१०२३
	५] पडीक जमीन [१९८५-८६]			
	१] चालू पड	–"–	२	८४२
	२] इतर पड	–"–	९२	९९१
	६] पिकाखालील क्षेत्र [१९८५-८६]			
	१] पिकाखालील निव्वळ क्षेत्र	–"–	११९	१८०३१
	२] दुसोटा क्षेत्र	हजार हेक्टर	४	२२३०
	३] एकूण पिकाखालील क्षेत्र	–"–	१२३	२०२६१
	७] ओलित क्षेत्र [१९८५-८६]			
	१] निव्वळ ओलित क्षेत्र	–"–	२२	१८८१
	२] एकूण ओलित क्षेत्र	–"–	२७	२४६२
	८] महत्वाच्या पिकाखालील क्षेत्र [अन्नधान्ये]	–"–	[१९८५-८६] ९१	[१९८६-८७] १३६६२
	९] वहित धारण जमीनी [१९८०-८१] अंतीम	संख्या[००]		
	१] २ हेक्टर पेक्षा कमी		१२६९	३४६६८
	२] २ ते १० हेक्टर	–"–	४४३	३०७७५
	३] १० हेक्टर पेक्षा जास्त	–"–	६७	३१८२
	१०] जमीन महसूल वसूली [१९८६-८७]	लाख रुपये	१७	२९६८
	११] जिल्हा परिषदांचा उपकर	हजार रुपये	९३४	उ.ना.
[पाच]	पशुसंवर्धन [१९८२]			
	१] पशुधन	संख्या हजारात	३७४	३०९१९
	२] गाई व बैल	–"–	२४१	१६१६१
	३] म्हशी व रेडे	–"–	८६	३९७२

१.	२.	३.	४.	५.
	४] मेंढया	संख्या हजारात	x	२६७१
	५] शेळया	-"-	४२	७७०५
	६] कोंबडया बदके	-"-	७४४	१९८४४
[सहा]	सहकार [१९८६-८७]			
	१] सहकारी संस्था	संख्या	४६६	८३४६०
	२] प्राथमिक कृषि सहकारी पत संस्था	-"-	२२३	१८३७७
	३] प्राथमिक कृषि सहकारी पत संस्थांची सभासद संख्या	संख्या हजारात	१०४	६५१८
	४] दूग्ध शाळा संस्था	संख्या	५७	१२७०३
	५] प्राथमिक कृषि संस्थानी दिलेली कर्जे	रूपये कोटीत	३	४८०
[सात]	जलसिंचन [३० जून १९८५]			
	१] पूर्ण झालेले पाटबंधारे प्रकल्प व त्याखालील लाभक्षेत्रा			
	१] मोठे प्रकल्प	संख्या	-	१६
	लाभ क्षेत्रा	हजार हेक्टर	-	उ. ना.
	२] मध्यम प्रकल्प	संख्या	-	४०
	लाभ क्षेत्रा	हजार हेक्टर	-	उ. ना.
	३] लघु प्रकल्प[पृष्ठभाग]	संख्या	-	१३०३
	लाभ क्षेत्रा	हजार हेक्टर	-	उ. ना.
	४] सिंचन विहिरी खाली भिजनारे क्षेत्रा [१९८५-८६]	-"-	३	१०६३
[आठ]	उद्योग			
	१] नोंदणीकृत कारखान्यांची संख्या[१९८६ अखेर]	संख्या	१२७	२३८८९
	२] नोंदणीकृत चालू कारखान्यांची संख्या [१९८६ अखेर]	-"-	११२	१९९६६
	३] साखार कारखाने[१९८६] चालू असलेले[खाजगी धरून]	-"-	-	१११
	४] सर्व सूत गिरण्यांची संख्या [१९८५-८६]	-"-	-	१३३

१.	२.	३.	४.	५.
	वीज			
[नऊ]	१] वीज पुरवठा केलेली शहरे व खोडी [३१ मार्च १९८७ रोजी]	संख्या	६५३	३७६३६
	२] विद्युतीकरण झालेल्या गावांची संख्या	–"–	६४९	उ.ना.
	३]वीज पुरवठा केलेले पंप संच	–"–	१२१७	११२४७६५
	४] गोबर गॅस सयंत्रे	–"–	४३८०	उ.ना.
[दहा]	सार्वजनिक आरोग्य[१९८६]			
	१] रुग्णालये	संख्या	५	७७८
	२] दवाखाने	–"–	१४	१७९७
	३] प्राथमिक आरोग्य केंद्रे	–"–	३६	१५३९
	४] प्राथमिक आरोग्य पथके	–"–	उ.ना.	८१
	५] एकात्मिक बाल विकास योजनागट	–"–	१	उ.ना.
	६] अंगणवाडीत उपस्थित राहणारी मुले	–"–	उ.ना.	उ.ना.
[अकरा]	शिक्षण [३०सप्टेंबर १९८७रोजी]			
	१] एकूण प्राथमिक शाळा	संख्या	१४२१	५४८६६
	२] एक शिक्षकी शाळा	–"–	४६३	१६७४६
	३] प्राथमिक शाळेतील विद्यार्थी	संख्या हजारात	१२५	९५७९
	४] प्राथमिक शाळेतील शिक्षक	–"–	५	२५०
	५] प्रत्येक शिक्षकामागे विद्यार्थी	संख्या	२५	३८
[बारा]	दुय्यम शिक्षण[३० सप्टेंबर १९८७ रोजी]			
	१] दुय्यम शाळा	संख्या	१५१	८४१७
	२] शाळेतील एकूण विद्यार्थी	संख्या	६२	४८७३
	३] शाळेतील शिक्षक	हजारात –"–	२	१५५
	४] प्रत्येक शिक्षकामागे दुय्यम शाळेतील विद्यार्थी	संख्या	२७	३१
[तेरा]	उच्च शिक्षण[३०-९-८७ रोजी]			
	१] संस्था	संख्या	६	९८०
	२] एकूण विद्यार्थी	संख्या हजारात	५	९००

१.	२.	३.	४.	५.
[चौदा]	अ] प्रौढ शिक्षण			
	१] प्रौढ शिक्षण केंद्रे	संख्या	६००	१८७३९
	२] प्रौढांची उपस्थिती	-"-	उ.ना.	उ.ना.
	ब] तांत्रिक शिक्षण[१९८५-८६]			
	१] औद्योगिक प्रशिक्षण संस्था			
	अ] शासकीय व शासन सहाय्यित	संख्या	१	१७९
	२] इतर [खाजगी]	-"-	-	उ.ना.
	२] शासकीय व शासन सहाय्यित औद्योगिक प्रशिक्षण संस्थेमध्ये मंजूर झालेल्या जागा	-"-	१९६	४१७३६
	३] तांत्रिक व व्यवसायिक शिक्षण संस्था			
	१] शासकीय व शासन सहाय्यित	-"-	१	उ.ना.
	२] इतर [खाजगी]	-"-	-	५७५
	४] शासकीय तांत्रिक व व्यवसाय शिक्षण संस्थांची प्रवेश क्षमता	-"-	९३	५३१२५
	५] अभियंत्यांची संख्या	-"-	५	उ.ना.
[पंधरा]	परिवहन आणि दळणवळण [१ मार्च १९८७ रोजी]			
	१] एकूण रेल्वे मार्गाची लांबी	कि.मी.	-	५४४०
	२] रस्त्यांनी जोडलेली गावे	संख्या	उ.ना.	उ.ना.
	३] एकूण रस्त्यांची लांबी [पृष्ठांकित] सुधारित	कि.मी.	३२९८	११६००६
	४] राष्ट्रीय महामार्गाची लांबी	-"-	१२०	२९४०
	५] राज्य महामार्ग	-"-	५२४	१९५३९
	६] महत्वाच्या जिल्हा रस्त्यांची लांबी	-"-	९१५	२६८३८
	७] इतर जिल्हा रस्त्यांची लांबी	-"-	७०४	२९५६७
	८] ग्रामीण रस्त्यांची लांबी	-"-	१०३५	८४२२४

१.	२.	३.	४.	५.
[सोळा]	पिण्याच्या पाण्याचा पुरवठा [१ एप्रिल रोजी] कठीण गावांची संख्या	संख्या	४६	६०१३
	१] खोडयाना केलेला पाणी पुरवठा	संख्या	१०७	उ.ना.
	अ] नळाचा पाणी पुरवठा	–"–	उ.ना.	–"–
	ब] कूप नलिका	–"–	–"–	–"–
	क] विहिर	–"–	–"–	–"–
	२] टॅकर्स किंवा बैलगाडीने पाणी पुरवठा केला जाणारी गावे	संख्या	४६ [१०७ वाड्या]	उ.ना.
	३] योजनेत समाविष्ठ करावयाची गावे	–"–	उ.ना.	–"–
[सतरा]	दारबांधणी			
	भूमिहीन कामगारांसाठी बांधलेल्या झोपडया [एकात्मिक ग्रामीण विकास कार्यक्रम]	संख्या	१६६	उ.ना.
[अठरा]	१] दारिद्रय रेषेखालील कुटूंबे [१९८२-८३]	संख्या लाखात	०.६०	४१
	२] मार्च १९८७ पर्यतचे लाभार्थी अ]जुने	संख्या	१६६४	१०८७४९
	ब] नवे	–"–	३१५८	१२९३६९
[एकोणीस]	रोजगार हमी योजना			
	१] मंजूर झालेली कामे	संख्या	३४५७	१४५६६
	२] पूर्ण झालेली कामे	–"–	३४०९	१२०९१
	३] अपूरी कामे [योजनेच्या सुरुवातीपासून]	–"–	१९२	६१८५४
	४] प्रगती पथावर असलेली कामे	–"–	६	१५०६३
	५] सुरु करता येण्यासारखी कामे	संख्या	१९२	९५४८
	६] नोंदणीकृत कामगार [३१-१०-८४]	–"–	२३१३२	४३२६८०६
	७] सरासरी दैनिक उपस्थिती [अद्यावत]	–"–	३८००	६२५५१६
	८] कमाल दैनिक उपस्थिती	–"–	उ.ना.	१०६१२६०

१.	२.	३.	४.	५.
	[वीस] आदिवासी कल्याणकारी योजना			
	१] आदिवासी करिता आश्रम-शाळा	संख्या	-	उ.ना.
	२] विद्यार्थी	-"-	-	उ.ना.
	[एकवीस] मागासवर्गीयांसाठी कल्याण कारी योजना			
	१] मागासवर्गीयांसाठी वसतीगृहे	संख्या	१६	उ.ना.
	२] वसतीगृहात राहणारे विद्यार्थी	-"-	४१६	-"-
	[बावीस] जिल्हा नियोजन			
	१] वार्षिक योजनेतील सर्वसा धारण तरतूद १९८६-८७	रुपये कोटीत	२	१९६४
	२] अनुशेष भारुन काढणेसाठी तरतूद	-"-	२	१८३
	[तेवीस] नागरी पुरवठा [१९८६]			
	१] रास्त भावाची दुकान	संख्या	३१६	६३३८९
	२] शासकीय गोदामे	-"-	१६	उ.ना.
	३] साठा एकूण [१९८६-८७]	टनामध्ये	उ.ना.	५७५५०८

टीप :- १] * अशी खूण केलेली आकडेवारी अस्थायी आहे.

२] x अशी खूण ५०० पेक्षा कमी आकडेवारी दर्शविते.

आधार :- अर्थ व सांख्यिकी संचालनालय, महाराष्ट्र राज्य, मुंबई.

जिल्हा सामाजिक व आर्थिक समालोचन

प्रस्तावना

कोकण विभागातील दक्षिण भागाचा औद्योगिक व कृषी क्षेत्रामध्ये जलद विकास साध्य करण्याच्या दृष्टीने सोईचे व्हावे आणि विकास योजनांची अंमलबजावणी कार्यक्षमतेने राबविणे सुलभ व्हावे म्हणून रत्नागिरी जिल्हयाचे १९८१ साली स्थानिक लोकांच्या मागणीने विभाजन करण्यात येऊन रत्नागिरी व सिंधुदुर्ग हे दोन जिल्हे निर्माण करण्यांत आले. सिंधुदुर्ग जिल्हा हा राज्यांमध्ये क्षेत्रफळाच्या दृष्टीने सर्वात लहान असून, जिल्हयाचे क्षेत्रफळ राज्याच्या एकूण क्षेत्रफळाच्या फक्त १.६५ टक्के आहे. पूर्वेकडे सह्याद्री पर्वताच्या उंच रांगा आणि पश्चिमेला पसरलेला अथांग अरबी समुद्र, उत्तरेला रत्नागिरी जिल्हा आणि दक्षिणेला गोवा राज्य अशा या जिल्हयाच्या चतु:सिमा आहेत. वेंगुर्ल्याचा समुद्र किनारा, मालवणचा इतिहास प्रसिध्द सिंधुदुर्ग किल्ला आणि आंबोली घाटातील द-याखो-यांनी नटलेला नयनरम्य परिसर गोव्याकडे जाणा-या येणा-या पर्यटकाचे लक्ष वेधून घेतो. राज्याच्या ७०० किलो मिटर किनारपट्टी पैकी १२१ किलो मिटर किनारपट्टी जिल्हयाला लाभली असून, हा सर्व परिसर नारळी-पोफळीच्या बागांनी नटलेला आहे.

कोकण विभागातील इतर जिल्हयाच्या भूभागाच्या तुलनेत या जिल्हयाचा बराचसा भूभाग सपाट असून, येथे प्रामुख्याने भात शेती केली जाते. काही भागामध्ये खरीप हंगामाबरोबरच रब्बी हंगामातही भाताचे पिक घेतले जाते. त्या खालोखाल चढउताराच्या जमिनिमध्ये नागली व कडधान्ये ही पिके घेतली जातात. या शिवाय नारळ, सुपारी, काजू व आंबा ही पिके प्रामुख्याने किनार पट्टीच्या भूप्रदेशामध्ये घेतली जातात. सन १९८५-८६ मध्ये जिल्हयाच्या एकूण भौगोलिक क्षेत्रापैकी ७२ टक्के क्षेत्र लागवडी लायक होते. त्यापैकी फक्त ३३ टक्के क्षेत्रच लागवडीखाली आणले गेले. एकूण अन्न धान्य पिकाखाली असलेल्या क्षेत्रापैकी ८१ टक्के क्षेत्र भाताखाली होते. जिल्हयातील लोकांचे

उपजिवीकेचे शेती हेच प्रमुख साधन असून भात हे मुख्य अन्न आहे. तथापि जिल्हयातील शेतीचे उत्पन्न हे वर्षभर पुरेल इतक्या प्रमाणात होत नसल्यामुळे बहुतांशी लोकांना मुंबईमध्ये नोकरी, धंदा करणा-या त्यांच्या नातेवाईकांकडून मिळणा-या पैशावर तसेच नोकरी व इतर जोड धंद्यावर अवलंबून रहावे लागते. तसेच पुरुष मंडळी नोकरी व्यवसायासाठी बाहेर जात असल्यामुळे स्त्रियांचे प्रमाण जिल्हयात अधिक आहे.

आंबा, काजू, नारळ, सुपारी, कोकम ही जिल्हयातील महत्वाची नगदी पिके असून, या पिकांच्या वाढीला पोषक अशी जमिन व हवामान येथे आहे. या पिकांच्या उत्पादनामध्ये वाढ करण्यास भरपूर वाव असल्यामुळे शासनाच्या फलोद्यान कार्यक्रमाव्दारे शेतक-यांना आर्थिक व तांत्रिक साह्य दिल्यामुळे पिकांखालील लागवडीच्या क्षेत्रामध्ये लक्षणिय वाढ झाली आहे. एकूण पिकांखालील क्षेत्रापैकी सुमारे १८ टक्के क्षेत्र या पिकाखाली आहे. जिल्हयातील देवगड तालुक्यातील हापूस आंबा, विशिष्ट चव व गोडी साठी प्रसिध्द असून त्याला देशात व परदेशात चांगली मागणी आहे. जिल्हयामध्ये फलोद्यान कार्यक्रमा बरोबरच १९८२-८३ पासून, सामाजिक वनिकरण खात्यामार्फत इतर जातीच्या वृक्षांची लागवड मोठया प्रमाणात घेण्यात आली आहे. या योजनेखाली काजू, सुबाभूळ, अकेशिया, साग इत्यादी प्रकारच्या वृक्षांची लागवड केली हात आहे. वीस कलमी कार्यक्रमाखाली सन १९८६-८७ मध्ये ३४.०० लाख रोपांच्या लागवडीचे उद्दिदष्ठ दिले होते. तर साध्य ३४.४५ [१०१ टक्के] लाख रोपांची लागवड करुन करण्यात आले.. जिल्हयाला १२१ किलोमिटर लांबीची किनारपट्टी लाभली असून, मालवण, वेंगुर्ला, देवगड, विजयदुर्ग या सारखी बंदरे व छोट्या-मोठ्या खाडया यामधून मोठ्या प्रमाणावर मच्छिमारी केली जाते. जिल्हयामध्ये सुमारे ११६० हेक्टर खा-या पाण्याचे क्षेत्र मत्स्य उत्पादनासाठी उपलब्ध असून, त्यामधून विशेषत: कोलंबी मोठया प्रमाणावर उपलब्ध होते. कोलंबीला परदेशातून चांगली मागणी असल्यामुळे

उत्पादन वाढीच्या दृष्टीने शासनाने या क्षेत्राकडे विशेष लक्ष पुरविले आहे. सन १९८६-८७ मध्ये एकूण २४१६९ मेट्रीक टन मत्स्य उत्पादन झाले व त्यापासून ९६७.६८ लक्ष रूपये उत्पन्न मिळाले. या व्यवसायास उत्तेजन देण्याकरिता शासनामार्फत युवकाना प्रशिक्षण आणि आर्थिक मदतही केली जाते.

राज्याच्या तुलनेत जिल्हयामध्ये १९८६ अखेर अनोंदणीकृत कारखान्यांची १२७ ही संख्या अल्प वाटत असली तरी जिल्हयाचे आकारमान लक्षात घेता, जिल्हयाच्या उद्योगधंद्यामध्ये दर वर्षी वाढ होत असल्याचे दिसून येते. कुडाळ, कणकवली आणि माजगांव येथे शासनाने औद्योगिक वसाहती स्थापन करून मोठया व लघु उद्योगाना चालना दिली आहे. जिल्हयामध्ये काजू या स्थानिक फळावर प्रक्रिया करणारे कारखाने असून सुप्रसिध्द काजू फेणी या मद्याचे उत्पादन करणारा कारखानाही आहे. याच बरोबर जिल्हयातील स्थानिक जंगली लाकूड व नारळीच्या झाडापासून अनुक्रमे खोळणी, केरसुणी काथ्या वगैरे वस्तू तयार करणारे कुटिरोद्योग मोठया प्रमाणात चालतात. सावंतवाडी येथे तयार होणारी लाकडी खोळणी सर्वत्र प्रसिध्द आहेत.

जिल्हयामध्ये खनिज साठेही भरपूर प्रमाणात उपलब्ध आहेत. जिल्हयाच्या दक्षिणेला किनारपट्टी लगत लोहयुक्त अशुध्द खनिज मोठया प्रमाणात आढळते, त्याची रेड्डी या बंदरातून निर्यात प्रामुख्याने रूमानिया या देशाकडे केली जाते. लोहखनिजा बरोबरच इलेमनाईट, क्रोमाईट, मॅगनीज व बॉक्साईट या खनिजाचे साठेही जिल्हयामध्ये भरपूर प्रमाणात आढळतात. याशिवाय इमारतीसाठी जांभा दगड विपूल प्रमाणात उपलब्ध असल्याने त्यांच्या खाणीही बहुतेक भागामध्ये आहेत.

औद्योगिक क्षेत्रात होणारी प्रगती, खनिज पदार्थाच्या उत्पादनाबरोबर होणारी खाणकामातील वाढ आणि मच्छिमारी यामुळे स्थानिक रोजगाराची संधी उपलब्ध होण्यास मदत झाली आहे. उद्योग धंद्याला आवश्यक असा कुशल कामगार वर्ग निर्माण

करण्याकरिता जिल्ह्यामध्यें शासकीय तंत्रनिकेतन व औद्योगिक प्रशिक्षण संस्था काढण्यात आल्या आहेत.

१. भौगोलिक स्थान व स्वाभाविक रचना

भौगोलिक स्थान :-

१. जुन्या रत्नागिरी जिल्ह्याचे विभाजन होऊन १ मे १९८१ रोजी हा जिल्हा अस्तित्वात आला. जुन्या रत्नागिरी जिल्ह्यामधील सहा तालुके [कणकवली, कुडाळ, सावंतवाडी, वेंगुर्ला, मालवण, देवगड] व कोल्हापूर मधील एक [वैभाववाडी] अशा सात तालुक्यांच्या एकत्रिकरणातून सिंधुदुर्ग जिल्ह्याची निर्मिती झाली आहे. या जिल्ह्याच्या पूर्वेस कोल्हापूर जिल्हा, दक्षिणेस कर्नाटक राज्यामध्यें असलेला बेळगांव जिल्हा व गोवा राज्य, उत्तरेस रत्नागिरी जिल्हा तर पश्चिमेस अरबी समुद्र आहे. या जिल्ह्याचे दक्षिणोत्तर अंक्षांश १५.३५° ते १६.४०° व पूर्व पश्चिम रेखांश ७३.१९° ते ७४.१३° असे आहेत.

क्षेत्रफळ व प्रशासकीय विभाग :-

२. राज्यामध्यें सर्वात कमी आकारमान असलेल्या या जिल्ह्याचे क्षेत्रफळ ५०८७.५ चौ. कि. मी. आहे. व महाराष्ट्र राज्याच्या एकूण क्षेत्रफळाच्या ते फक्त १.६५ टक्के आहे. दैनंदिन कारभाराच्या साईसाठी जिल्ह्याचे [१] सावंतवाडी व [२] कणकवली असे दोन प्रशासकीय उपविभाग पाडले आहेत. सावंतवाडी उपविभागामध्यें सावंतवाडी, वेंगुर्ला व कुडाळ या तीन तालुक्यांचा तर कणकवली उपविभागामध्यें कणकवली, मालवण, देवगड व वैभाववाडी या चार तालुक्यांचा समावेश आहे. जिल्हा मुख्यालय कुडाळ या गांवी आहे.

३. जिल्ह्यात सात तालुके असून, ७०६ खेडी व तीन नगरपरिषदा आहेत. ७०६ खेडयापैकी एक खेडे ओसाड आहे. सावंतवाडी १४०, वेंगुर्ला ७८, कुडाळ १२४, कणकवली ११२ [एक ओसाड], मालवण १३५, देवगड ६४ व वैभाववाडी ५३ याप्रमाणे तालुकानिहाय खेडयांची संख्या आहे.

४. जिल्हयामध्यें सावंतवाडी, वेंगुर्ला व मालवण या तीन नगरपरिषादा आहेत व त्या तालुका मुख्यालयाच्या ठिकाणी आहेत. जिल्हयात सन १९८६-८७ मध्यें एकूण ४०० ग्रामपंचायती होत्या व त्या सर्व ग्रामपंचायतीमधील एकूण सभासदांची संख्या ३९४० होती. ४०० ग्रामपंचायतीपैकी ३४८ स्वतंत्र व ५२ गृप ग्रामपंचायती आहेत.

स्वाभाविक रचना

५. स्वाभाविक रचनेच्या दृष्टीने हो जिल्हा तीन विभागांत विभागता येईल. १] सहयाद्रीचा डोंगर भाग २] डोंगर उतारावरील मध्य पट्टा याला स्थानिक भाषेत "वलाटी" [वरचा पट्टा] असे म्हणतात. ३] समुद्र सपाटीला लागून असलेला सागरी पट्टा याला स्थानिक भाषेत खालाटी म्हणतात. स्वाभाविक रचनेत सदर पट्टे स्पष्टपणे दिसून येत नाहीत त्याचे कारण म्हणजे सहयाद्रीच्या आडव्या ४ मालिका, ज्यांची उंची ५० ते ४५० मीटर आहे. कांही ठिकाणी त्या थेट समुद्रास भिडलेल्या आहेत. समुद्र पट्टयालगत ६ ते १० किलोमिटर रूंदीचा वाळू मिश्रीत मातीचा पट्टा आहे त्याला पोयटा [Alluvia] म्हणतात. सदर पट्टयालगत उंचवटयाचा भाग आल्याने या भागाला सलगता राहिलेली नाही. या जिल्हयाची दक्षिणोत्तर लांबी अंदाजे १२१ किलोमीटर आहे.

६. विशिष्ट हवामानामुळे "बॅसॉल्ट" दगडापासून जांभा दगड तयार झाला व ही प्रक्रिया समुद्रसपाटीपासून १५० ते १७५ मीटर उंचीपर्यंत आढळून येते. बॅसॉल्ट व्यतिरिक्त कांही तालुक्यात ग्रॅनाईट, ग्नेईस देखील आढळून येतात.

मातीचा प्रकार

७. वर नमूद केल्याप्रमाणे जिल्हयात प्रामुख्याने बॅसॉल्ट, ग्रॅनाईट आणि ग्नेईस आढळून येतात. विशिष्ट हवामान व भूरचना यामुळे बॅसॉल्ट दगडाचे रूपांतर जांभ्या दगडात होते व त्यापासून " लॅटरायटीक " जमिन तयार होते. समुद्रकिना-यावरील भूप्रदेशात क्षारयुक्त जमिन व पोयटयाची जमिन आढळून येते. पश्चिमी डोंगर माथ्याच्या भागांत उथळ व हलकी जमिन दिसून येते. या जिल्हयात आढळून येणा-या जमिनीचे प्रामुख्याने पुढील तीन प्रकारात वर्गीकरण करता येईल.

[१] जांभ्या दगडापासून तयार झालेली लॅटेरायटीक जमिन

अत्याधिक पाऊस, उतार आणि हवेतील आर्द्रता यामुळे बॅसॉल्ट दगडातील सिलीका वाहून जाते व तसेच कॅल्शियम, मॅग्नेशियम वाहून जातात. अशा प्रकारे जांभ्या दगडापासून तयार झालेल्या जमिनीत लोह आणि ॲल्युमिनीयम ऑक्साईडचे प्रमाण जास्त असते, त्यामुळे जमीन आम्लधार्मीय होते. या प्रकारच्या जमिनीचा सामू [p.H.], ४.७५ ते ६.० आहे व सरासरी सामू ५.६ आहे. सेंद्रीय कर्बाचे प्रमाण ०.६ ते २.३२ टक्के असून ते हवामान, उंची आणि झाडे झुडपांवर अवलंबून असते. उपलब्ध स्फुरदाचे प्रमाण ४.३० ते १४.४ भाग प्रती दशलक्ष इतके असते. पिके नत्राच्या वापराला प्रतिसाद देतात. जमिनीत पालाशाचे [potash] प्रमाण जास्त आहे.

[२] समुद्र किना-यावरील खारट व पोयटायुक्त जमिन

सदर जमिन समुद्रकिना-यालगतच्या भागात आढळून येते. पोयटायुक्त जमिन डोंगराच्या उतारावरील भागात झालेल्या धूपीबरोबर आलेल्या माती व गाळ यापासून तयार झालेली आहे. खारवट जमिनीत अति पर्जन्यमान असून, देखील क्षाराचे प्रमाण जास्त असते. क्षारयुक्त जमिनीत मीटाचे [सोडीयम क्लोराइड] प्रमाणे ०.६४ ते २.६३ टक्के असते. जमिनीचा सामू ५.६ ते ८.२ च्या दरम्यान असतो. सेंद्रीय कर्बाचे प्रमाण ०.४१ ते १.१८ टक्के असून उपलब्ध स्फुरदाचे प्रमाण ३४.४ किलो प्रति हेक्टर इतके आहे.

[३] हलकी व उथळ जमीन

सदर जमीन बॅसॉल्ट पासून तयार झालेली असून, ती या डोंगराळ भागात आढळून येते. अधिक उतारावर सदर जमिनीची खोली काही सें. मी. पासून १ मीटर पर्यंत असू शकते. जमीन उदासिन ते हलकी आम्लयुक्त असते ही जमीन पोयटायुक्त वालुकामय प्रकारची असून, मुक्त कॅलशियम कार्बोनेट विरहीत असते. सेंद्रीय कर्बाचे प्रमाण ०.९४ ते २.५३ टक्के असून, उपलब्ध स्फुरदाचे प्रमाण कमी असते. या जमिनीमध्ये उपलब्ध पालाशाचे प्रमाण १८२ ते ५३८ किलो प्रति हेक्टर असते.

नद्या

८. या जिल्ह्यामध्ये वाघोटन, कर्ली, तिल्लारी, खाडी, तेरेखोल, जोग व जगबुडी या सात नद्या आहेत. या सर्व नद्या सह्याद्रीच्या डोंगर कपा-यामध्ये उगम पावून अरबी समुद्रास मिळतात. पावसाळ्यामध्ये नद्या रौद्रस्वरूप धारण करून वाहत असतात. तर इतर वेळी त्या कोरड्या असतात. येथील सर्वच नद्यांच्या पात्राची रुंदी फारच कमी आहे. तेरेखोल खाडीवर गोवा राज्यामध्ये जलमार्ग वाहतूक चालू असते.

हवामान व पर्जन्यमान

९. जिल्ह्याचे हवामान दमट आहे. हवेतील आर्द्रता ही सर्व साधारण पणे ५५^{0} सेल्सिअस पेक्षा कमी नसते. जिल्ह्यातील सावंतवाडी तालुक्या-तील आंबोली या घाटमाथ्यावर पावसाचे प्रमाण जास्त आहे. सन १९८६ या वर्षात सर्वात कमी पाऊस देवगड तालुक्यात पडला. तर सर्वात जास्त पाऊस वैभववाडी तालुक्यात पडलेला दिसून येतो.

१०. येथील नद्यांना बारमाही पाणी नसल्याने उन्हाळ्यामध्ये बहु-तेक सर्व तालुक्यामध्ये पाण्याची टंचाई जाणवते. जिल्ह्याची समुद्र-सपाटीपासून उंची जास्त नसल्याने भूपृष्ठाखाली सरासरी ४० ते ५० फूटावर पाणी उपलब्ध होऊ शकते.

२. लोकसंख्या

१९८१ जनगणना व दशवार्षिक वाढ

११. १९८१ च्या जणगणनेनुसार जिल्ह्याची लोकसंख्या ७८०८९१ होती त्यापैकी पुरुष व स्त्रियांची लोकसंख्या अनुक्रमे ३५४१२८ व ४२६७६३ होती. १९७१ च्या तुलनेत १९८१ च्या लोकसंख्येमध्ये ३.३० टक्क्यांनी वाढ झाली. १९८१ च्या जनगणनेनुसार कुरगवली १५.६ टक्के, कुडाळ १६.६ टक्के, सावंतवाडी २१.७ टक्के, वेंगुर्ला १०.९ टक्के, मालवण १५.१ टक्के, देवगड १४.० टक्के व वैभववाडी ६.१ टक्के याप्रमाणे तालुकानिहाय लोकसंख्येचे प्रमाण होते.

घनता

१२. राज्यामध्ये सर्वात कमी आकारमान असलेल्या या जिल्ह्याच्या लोकसंख्येची घनता १९८१ च्या जनगणनेनुसार दर चौ. कि.मी. ला १५४ होती. महाराष्ट्र राज्यासाठी हेच प्रमाण २०४ होते. जिल्ह्यातील निरनिराळ्या तालुक्यांच्या लोकसंख्येच्या घनतेचा विचार करता वेंगुर्ला

तालुक्यांचो घनता सर्वात जास्त [२६१] तर वैभववाडी तालुक्याचो घनता सर्वात कमी [११४] होती.

ग्रामीण व नागरी लोकसंख्या

१३. १९८१ च्या जनगणनेनुसार जिल्ह्याच्या एकूण लोकसंख्येपैकी ९३.५ टक्के लोक ग्रामीण भागात तर ६.५ टक्के लोक नागरी भागात राहत होते. कुडाळ, देवगड, वैभववाडी हे तालुके पूर्णपणे ग्रामीण होते. तर कणकवली, सावंतवाडी, वेंगुर्ला व मालवण या तालुक्यांचो अनुक्रमे ९८.२ टक्के, ८९.० टक्के, ८५.६ टक्के व ८५.३ टक्के लोकसंख्या ग्रामीण होती.

स्त्री-पुरुष प्रमाण

१४. १९८१ च्या जनगणनेनुसार जिल्ह्यात दर हजार पुरुषामागे १२०५ स्त्रिया होत्या. महाराष्ट्र राज्याकरिता हेच प्रमाण ९३७ होते. जिल्ह्यातील ग्रामीण व नागरी भागामध्ये दर हजार पुरुषामागे स्त्रियांचे प्रमाण अनुक्रमे १२१७ व १०४७ होते.

अनुसूचित जाती व जमाती

१५. १९८१ च्या जनगणनेनुसार अनुसूचित जाती व जमातींचे प्रमाण अनुक्रमे ४.० टक्के व ०.८६ टक्के होते. राज्याकरिता हेच प्रमाण अनुक्रमे ७.१४ व ९.१९ टक्के होते.

कामगार

१६. १९८१ च्या जनगणनेनुसार जिल्ह्यातील कामगारांची संख्या २५२८१२ होती व ती जिल्ह्याच्या एकूण लोकसंख्येच्या ३२.४ टक्के होती. एकूण कामगारांच्या संख्येमध्ये शेतकरी ६३.१ टक्के, शेतमजूर ९.० टक्के, घरगुती उद्योग व वस्तुनिर्माण क्षेत्रातील कामगार २.४ टक्के व इतर काम करणारे २५.५ टक्के होते.

साक्षरता

१७. १९८१ च्या जनगणनेनुसार जिल्ह्यातील लोकसंख्येचे साक्षरता प्रमाण ५४.० टक्के होते. महाराष्ट्र राज्याकरिता हेच प्रमाण ४७.१८ टक्के होते. ग्रामीण व नागरी भागातील पुरुष व स्त्रियांचे साक्षरतेचे प्रमाण अनुक्रमे ६५.० टक्के व ४२.७ टक्के व ८०.० टक्के व ६५.२ टक्के

होते. तालुकानिहाय लोकसंख्येचे साक्षरता प्रमाण कणकवली ५४.२ टक्के, कुडाळ ५३.८ टक्के, सावंतवाडी ५२.१ टक्के, वेंगुर्ला ६०.६ टक्के, मालवण ६१.७ टक्के, देवगड ५२.५ टक्के व वैभववाडी ३८.४ टक्के याप्रमाणे होते.

वापरातील निवासी घरे

१८. जिल्ह्यातील एकूण १२९०२१ निवासी घरांपैकी ९५ टक्के निवासी घरे ग्रामीण भागांत तर ५ टक्के घरे निवासी नागरी भागांत होती. त्याचप्रमाणे जिल्ह्यातील १५०७४३ कुटुंबांपैकी ९२.८ टक्के कुटुंबे ग्रामीण भागामध्ये तर ७.२ टक्के कुटुंबे नागरी भागांमध्ये रहात होती.

३. वने

१९. १९८५-८६ च्या उपलब्ध आकडेवारीनुसार जिल्ह्यातील जंगल-व्याप्त क्षेत्रा ३३ हजार हेक्टर होते. हे जिल्ह्याच्या एकूण भौगोलिक क्षेत्राच्या ६.५ टक्के होते. कणकवली २७.३ टक्के, कुडाळ २४.५ टक्के, सावंतवाडी ३८.६ टक्के, वेंगुर्ला २.१ टक्के, मालवण ०.७ टक्के, देवगड ०.०१ टक्के, वैभववाडी ६.८ टक्के याप्रमाणे तालुकानिहाय जंगलव्याप्त क्षेत्रा होते. या जिल्ह्यातील जंगल वन खात्याच्या अखत्यारीत आहे.

वनोत्पादन

२०. वनोत्पादनापासून मिळालेल्या मुल्यामध्ये १९८६-८७ मध्ये गतवर्षापेक्षा २९.१५ टक्यांनी वाढ होऊन ते ३९ लाख रुपये झाले. यामध्ये १३८१ घनमीटर इमारतीच्या लाकडापासून मिळालेले मुल्य सर्वाधिक म्हणजे २४.६३ लाख रुपये होते. जळाऊ लाकडापासून १२.४२ लाख रुपये आणि अन्य उत्पादनापासून १.९५ लाख रुपये मिळाले. जिल्ह्यामध्ये साग, जळावू लाकूड ही मुख्य आणि बांबू, हिरडा, कोकम बेत, काजू, शिकेकाई हे दुय्यम वनोत्पादने आहेत.

४. शेती

२१. १९८५-८६ या वर्षाकरिता महसूल खात्यामार्फत तयार केलेल्या वार्षिक ऋतु व पिके अहवालातील आकडेवारीनुसार जिल्ह्याचे एकूण क्षेत्रा ५०४७५० हेक्टर होते. यापैकी जंगलव्याप्त क्षेत्रा ६.५ टक्के होते.

लागवडीलायक नसलेली जमीन आणि पडीत जमीन यांनी व्यापलेले क्षेत्र २१.५ टक्के होते. लागवडीलायक परंतु वापरात न आणलेले, झोतो शिवाय इतर उपयोगासाठी आणलेले पालू व इतर पडीत क्षेत्र अनुक्रमे २७.३ टक्के, ३.५ टक्के, ०.३ टक्के आणि १८.३ टक्के होते. प्रत्येक तालुक्याच्या लागवडीयोग्य क्षेत्रापैकी प्रत्यक्ष लागवडीखाली आणलेले क्षेत्र आजकवली २२३४३ हेक्टर [४०.५ टक्के], कुडाळ २२०५४ हेक्टर [३८.७ टक्के] सावंतवाडी २६०७९ हेक्टर [३१.५ टक्के], चेंदवण १०१६७ हेक्टर [४८.९ टक्के] मालवण १८७५५ हेक्टर [४४.८ टक्के] देवगड १८८८ हेक्टर [१६.५ टक्के] वेंगुर्ला ७७२७ हेक्टर [२३.४ टक्के] याप्रमाणे होते.

कुळागरांना [जमिनीचा वापर]

३२. कुळागरांना १९८०-८१ नुसार सिंधुदुर्ग जिल्हयामध्ये एकूण १७७९५७ जमीनधारक होते. त्यानी धारण केलेले एकूण क्षेत्र ४०१७४७ हेक्टर होते. दोन हेक्टर पेक्षा कमी क्षेत्र धारण केलेले ७१.३ टक्के धारक होते. त्यानी १८.३ टक्के जमीन धारण केली होती २ ते ५ हेक्टर पर्यंत जमीन धारण केलेले १७.५ टक्के धारक होते व त्यानी धारण केलेली जमीन २४.३ टक्के होती. ५ ते १० हेक्टरपर्यंत जमीन धारण केलेल्या ७.४ टक्के धारकांनी २२.५ टक्के जमीन धारण केली होती. तर १० ते २० हेक्टर पर्यंत जमीन धारण केलेले फक्त २.८ टक्के धारक होते व त्यानी धारण केलेली जमीन मात्र १६.७ टक्के होती. २० हेक्टर पेक्षा अधिक जमीन धारण केलेले १.० टक्का धारक होते त्यानी धारण केलेले जमिनीचे क्षेत्र मात्र १८.२ टक्के होते.

पिके व पिकांचा आढावा

३३. या जिल्हयामध्ये भात, रागी, वरी, कोद्रा, कुळीथ ही मुख्य धान्य पिके तर आंबा, काजू, नारळ ही फळ पिके घेतली जातात. या जिल्हयाचे भात हे प्रमुख पिक आहे.

३४. १९८५-८६ साली एकूण १२३१६१ हेक्टर क्षेत्र लागवडीखाली आणले गेले. त्यापैकी भाताखाली ५९.५३ टक्के, रागी [नाचणी] ७.०७ टक्के, कुळीथ २.६६ टक्के आणि कोद्रा १.६५ टक्के व इतर पिके २९.९ टक्के याप्रमाणे क्षेत्राचा पिकवार विभागणी होती. १९८४-८५ मध्ये एकूण पिकाखालील क्षेत्रापैकी भाताचे क्षेत्र ५९.४० टक्के व

रागी [नाचणी] ७.७३ टक्के व इतर पिकाखालील क्षेत्र ३२.८७ टक्के होते.

२५. १९८५-८६ मधील भाताचे क्षेत्र ७३३१६ हेक्टर होते. भात पिकाखाली तालुकानिहाय क्षेत्राची टक्केवारी काढल्यास १५.७, कुडाळ २५.०, सावंतवाडी २०.९, वेंगुर्ला ७.१, मालवण १५.३, देवगड ८.५ व वैभववाडी ७.५ याप्रमाणे होती. याशिवाय रागी [नाचणी] वरी व कुळीथ ही पिके जिल्ह्यात घेतली जातात. रागीचा अपवाद वगळता इतर पिकाखालील क्षेत्र फारच कमी असते. १९८५-८६ मधील रागी पिकाखालील क्षेत्र ८७०९ हेक्टर होते. यापैकी सर्वात जास्त क्षेत्र सावंतवाडी तालुक्यात [२८.९ टक्के] आणि सर्वात कमी क्षेत्र वेंगुर्ला तालुक्यात [३.६ टक्के] होते.

२६. १९८५-८६ मध्ये जिल्ह्यात जी इतर पिके घेतली होती त्याखाली असलेले क्षेत्र, कोद्रा ३०२८ हेक्टर, वरी १८५४ हेक्टर, कुळीथ ३३७५ हेक्टर याप्रमाणे होते.

२७. जिल्ह्यामध्ये फळांची लागवड मोठ्या प्रमाणात केली जाते. त्यामुळे शेतकऱ्यांना त्यापासून चांगले उत्पन्न मिळते. देवगड तालुक्यात होणाऱ्या हापूस आंब्याला राष्ट्रीय तसेच आंतरराष्ट्रीय बाजारपेठेत चांगली मागणी आहे. १९८५-८६ मध्ये ६२३१ हेक्टर क्षेत्र आंब्याच्या लागवडीखाली होते. आंब्याची लागवड दिवसेंदिवस किफायतशीर होत असल्यामुळे त्या खालचे क्षेत्रही वाढत आहे. १९८४-८५ पेक्षा १९८५-१९८६ मध्ये ३८० हेक्टर जास्त क्षेत्रात आंब्याची लागवड करण्यात आली होती. जिल्ह्यात आंब्याखाली असलेल्या क्षेत्रात सर्वात जास्त क्षेत्र [३५.४ टक्के] देवगड तालुक्यात होते. याशिवाय वेंगुर्ला [२१.५ टक्के] सावंतवाडी [१४.२ टक्के] कुडाळ [१२.१ टक्के], मालवण [११.७ टक्के] आणि कणकवली [५.१ टक्के] याप्रमाणे तालुकानिहाय क्षेत्र आंब्याच्या लागवडीखाली होते.

२८. जिल्ह्यात १९८५-८६ साली नारळाखाली ५४८६ हेक्टर क्षेत्र होते. जिल्ह्यामध्ये सर्वच तालुक्यात नारळ होत असली तरी वेंगुर्ला, सावंतवाडी व मालवण या तीन तालुक्यातच जिल्ह्यातील एकंदर क्षेत्राच्या ८६ टक्के [वेंगुर्ला तालुक्यात ३१ टक्के, सावंतवाडी तालुक्यात ३० टक्के तर मालवण तालुक्यात २५ टक्के] क्षेत्र नारळाखाली होते.

१९८५-८६ मध्ये सुपारीखालील क्षेत्र ३८१ हेक्टर होते. सुपारी-खालील सर्वात जास्त २४८ हेक्टर क्षेत्र सावंतवाडी तालुक्यामध्ये होते. तर वैभववाडी तालुक्यामध्ये हे पिक घेतले जात नव्हते. चा-याच्या पिकाखालो १९८४-८५ मध्ये एकूण ७०१५ हेक्टर क्षेत्र होते ते १९८५-८६ सालो ७२२२ हेक्टर पर्यंत वाढले.

पिक उत्पादन व दर हेक्टरी उत्पादन

२९. जिल्ह्याचे हवामान मुख्यत्वेकरून फळबागायतीसाठी पोषक आहे. धान्य पिकाखालील भात, नाचणी, कोद्रा तर कडधान्यामध्ये कुळीथ हो येथील महत्वाची पिके आहेत. खताच्या वापरामुळे येथील पिकांच्या उत्पादनामध्ये वाढ झालेली आहे.

३०. भाताचे उत्पादन १९८६-८७ साली १३५९०० टन होते व दर हेक्टरी उत्पादन १६९६ किलो होते. १९८५-८६ साली भाताचे उत्पादन १४१९०० टन होते. या उत्पादनापेक्षा १९८६-८७ मधील उत्पादना-मध्ये ६००० टनाने घट झालेली आहे. कारण सन १९८६-८७ मध्ये वेळेवर पाऊस नसून हवामान योग्य नव्हते.

३१. १९८६-८७ मध्ये नाचणीचे उत्पादन ५८०० टन होते ते १९८५-८ पेक्षा ८४०० टनानी कमी झाले. या पिकाचे दर हेक्टरी उत्पादन ५५२ किलो होते.

३२. १९८६-८७ साली नारळाचे उत्पादन ६०७४२ हजार नग होते. मागील वर्षापेक्षा हे उत्पादन ४०९७ हजार नगानी कमी आहे. कारण सन १९८६-८७ या वर्षी पाऊस वेळेवर झालेला नसून पिकांच्या वाढी-करिता हवामान योग्य नव्हते.

अधिक उत्पन्न देणा-या जाती

३३. निरनिराळ्या पिकांच्या जादा उत्पन्न देणा-या जातीचा उपयोगाच्या तंदर्भात विचार केला तर या जिल्ह्यामध्ये फक्त भूईमूग उत्पादनामध्ये वाढ झाल्याचे दिसून येते. इतर पिकांच्या बाबतीत कमी पाऊस व अयोग्य हवामान यामुळे उत्पादनात घट झालेली आहे.

रासायनिक खतांचा वापर

३४. १९८६-८७ मध्ये ११८१६ मे.टन रासायनिक खताचे व १६४८१ मे.टन सेंद्रीय खताचे वाटप जिल्ह्यामध्ये झाले. वाटप झालेल्या

एकूण रासायनिक खतापैकी युरिया १७.३ टक्के, सुपर फॉस्फेट ४.७ टक्के, अमोनिया सल्फेट ६.१ टक्के, डाय अमो. फॉस्फेट ०.४ टक्के, मुरेट [१५×१५×१५] ७.५ टक्के संयुगी ८.२ टक्के कृषिउद्योग ५१.२ टक्के इतर ४.६ टक्के होते. जिल्हयामध्ये जिल्हा परिषदेच्या यंत्रणेमार्फत बहुतांशी खताचे वाटप केले गेले.

पिकांच्या संरक्षणाचे उपाय

३५. १९८६-८७ मध्ये पिक संरक्षण उपाय योजनेखाली जिल्हा परिषदेमार्फत किटकनाशके व बुरशी नाशके याकरिता ७१२२३५ रुपये खर्च करण्यात आला.

कृषिउत्पन्न बाजारपेठा व गोदामे

३६. जिल्हयामध्ये नियंत्रित बाजारपेठ नसल्याने कृषि उत्पादनाची विक्री नियंत्रित बाजारपेठेमार्फत होत नाही.

३७. जिल्हयामध्ये १६ शासकीय गोदामे असून प्रत्येक तालुका मुख्यालयाच्या ठिकाणी धान्य साठविण्याच्या सुविधा उपलब्ध आहेत.

जमीन सुधारणा

३८. मृद संधारण, बांध घालणे, उतारावर समतोल घालणे, इत्यादी उपायाद्वारे जमिनीचा विकास करणे ही कामे जिल्हयातील मृदसंधारण कार्यालयामार्फत केली जातात. जिल्हयात तीन उपविभागीय कार्यालये आहेत. कणकवली, कुडाळ व सावंतवाडी या उप विभागीय कार्यालयाच्या अधिपत्याखाली येणा-या तालुक्यातील जमीन सुधारणा विकास करणेत येतो. ज्या जमिनी सुधारीत केल्या आहेत त्यामध्ये प्रामुख्याने आंबा लागवड, काजू लागवड तसेच भात लागवड करणेत आलेली आहे. तसेच खार भूमि विकास बोर्डामार्फत खार बंधारा-यांची कामे जिल्हयात घेण्यात येतात. व समुद्राचे खारे पाणी बंधारा-यांनी अडवून, भात शेतीच्या जमिनीला संरक्षण देण्यात येते. या यंत्रणेचे उप विभागीय कार्यालय कणकवली येथे आहे.

५. जलसिंचन

सिंचनाची साधने

३९. १९८४-८५ पेक्षा १९८५-८६ मध्ये औलिताखालील निव्वळ

क्षेत्रामध्ये २०५० हेक्टरने वाढ होऊन ते २२०२१ हेक्टर झाले. १९८५-८६ मध्ये सिंचनाच्या प्रकारानुसार सिंचन क्षेत्राचा विभागनिहाय तपशील पुढीलप्रमाणे होता. पृष्ठभागीय सिंचनामुळे १८९०९ हेक्टर क्षेत्र भिजत होते. विहिरींमुळे ३११२ हेक्टर क्षेत्र पाण्याखाली आले होते एकूण ओलिताखालील २७०१४ हेक्टर क्षेत्रापैकी मालवण तालुक्यामध्ये सर्वात जास्त म्हणजे ७३९० हेक्टर क्षेत्र ओलिताखाली होते. इतर तालुक्यामध्ये ओलिताखाली असलेले क्षेत्र कणकवली २६७७, कुडाळ ४२७८, सावंतवाडी ४०५६, वेंगुर्ला ५६९४, देवगड ६५२ व वैभववाडी २२६७ हेक्टर याप्रमाणे होते.

४०. १९८४-८५ मध्ये विजेचे व डिझेल पंपसेट बसविलेल्या सिंचन विहिरींची संख्या अनुक्रमे ६०० व १५५ होती. त्यामध्ये अनुक्रमे ५९ व २६ ने वाढ होऊन १९८५-८६ मध्ये ती ६५९ व १८१ झाली. कणकवली तालुक्यामध्ये सर्वात जास्त विजेचे पंपसेट बसविलेल्या विहिरी होत्या. १९८५-८६ मध्ये जिल्ह्यात एकास्त्री कुपनलिकांची संख्या ५९५ एवढी होती. त्यापैकी ५९३ कूपनलिकांवर हात पंप बसविलेले होते.

४१. १९८५-८६ या वर्षी जिल्ह्यातील झरासकीय कालव्यांची लांबी ५६१ कि.मी. होती. झरासकीय व खाजगी कालव्याखालील निव्वळ बागायती क्षेत्र १७७४ हेक्टर होते. वैभववाडी तालुक्यामध्ये कालवे नव्हते कालव्यानी बागायती खाली आणलेले निव्वळ क्षेत्रापैकी सावंतवाडी तालुक्यामध्ये १२७० हेक्टर इतके क्षेत्र होते. हे सर्व तालुक्याच्या तुलनेत अधिक होते.

४२. १९८४-८५ मधील ओलिताखालील एकूण क्षेत्रामध्ये १३०६ हेक्टरने घट होऊन १९८५-८६ मध्ये ते २७०१४ हेक्टर झाले. जिल्ह्यातील लागवडीखालील एकूण क्षेत्राच्या २१.९ टक्के क्षेत्र ओलिताखाली होते. १९८५-८६ मध्ये काही प्रमुख पिकांचे ओलिताखाली असलेल्या क्षेत्राची टक्केवारी तांदुळ १६.४, भुईमूग ४.०, कुळीथ ११.२ पाले व भाजीपाला २८.९ नारळ १९.७, सुपारी १.४ टक्के याप्रमाणे होती.

सिंचन क्षमता

४३. १९८५-८६ या वर्षी एकूण लागवडीखालील क्षेत्राच्या २१.९ टक्के क्षेत्र ओलिताखाली होते. त्याच वर्षाच्या निव्वळ पिकाखालील क्षेत्राशी हे प्रमाण २२.७७ टक्के होते.

मोठे, मध्यम व लघुपाटबंधारे प्रकल्प

४४. जिल्हयामध्ये तळंबा व तिल्लारी या दोन मोठया पाटबंधारे प्रकल्पांच्या प्राथमिक कामास सुरवात झालेली आहे. प्रकल्प पूर्ण झाल्यावर तळंबा व तिल्लारी प्रकल्पाखाली अनुक्रमे १७००० हेक्टर व २३६५४ हेक्टर क्षेत्रा ओलिताखाली येईलन तिलारी प्रकल्प हा महाराष्ट्र व गोवा या दोन्हो राज्याचा संयुक्त प्रकल्प आहे. करावयाचे येथो होगा-या मध्यम पाटबंधारे प्रकल्पामुळे प्रकल्प पूर्ण झाल्यावर ४५१२ हेक्टर क्षेत्रा ओलिताखाली येईल.

पूर

४५. सन १९८६-८७ मध्ये पुरग्रस्त गांवे नव्हती. तसेच त्या वर्षात पुरामुळे [illegible]

६. पशुसंवर्धन, पशुवैद्यकीय सेवा व दुग्धोत्पादन

४६. १९८२ च्या पशुगणनेनुसार जिल्हयातील पशूंची संख्या ३७४४२१ होती. यापैकी गायी व बैल २४०९३२ म्हणजेच एकूण पशुंच्यात६४.३ टक्के होते. म्हशी व रेड्यांची संख्या [illegible] टक्के होती. मेंढया व शेळयांची संख्या ११.३ टक्के होती. जिल्हयामध्ये फक्त २९ घोडे व शिंगरे होती.

४७. १९७८ च्या पशुगणनेच्या तुलनेने १९८२ मध्ये पशूंच्या संख्येमध्ये ५.३ टक्यानी वाढ झाली. तर गाईंच्या संख्येमध्ये ०.२ टक्यानी घट झाली. तर रेडे व म्हशींच्या संख्येमध्ये १५.२ टक्यानी वाढ झाली. तीन वर्षांवरील गाई व म्हशींच्या संख्येमध्ये अनुक्रमे २.९ टक्के घट व ९.६ टक्के वाढ झाली. शेळयांच्या संख्येमध्ये ५.३ टक्के वाढ झाली. कोंबडयांच्या संख्येमध्ये १४.७ टक्यानी वाढ झाली.

४८. जिल्हयामध्ये सावंतवाडी व मालवण नगर परिषदेच्या हद्दीमध्ये अधिकृत कत्तलखाने आहेत. १९८६-८७ मधील अधिकृत कत्तलखान्यात कापलेल्या जनावरांची संख्या ३९६३ होती. १९८६-८७ मधील सावंतवाडी व मालवण तालुक्यामध्ये कापलेल्या जनावरांची संख्या अनुक्रमे ३०११ व ९५२ होती.

पशु वैद्यकीय सेवा

४९. जिल्हयामध्ये एक पशुवैद्यकीय रुग्णालय, ८ पशुवैद्यकीय दवाखाने व २४ पशुवैद्यकीय प्रथोमोपचार केंद्रे होती. जिल्हयामध्ये ३० पशुवैद्यकीय डॉक्टर व ४६ पशुवैद्यक होते. १९८६-८७ मध्ये वैद्यकीय उपचार

केलेल्या जनावरांचो संख्या १५३६६५ होतो. १९८६-८७ सालो उपचार केलेल्या जनावरांचो संख्येमध्ये १९८५-८६ पेक्षा २३.० टक्यानी वाढ झालो. १९८५-८६ मध्ये जिल्हयात असलेल्या एकूण ४६ कृत्रिम गर्भ-धारणा केंद्रात कृत्रिमरित्या गर्भधारणा केलेल्या गाईंचो संख्या ४००७ होतो.

५०. १९८६-८७ मध्ये १८४ जनावरांना निरनिराळ्या रोगांचो लागण झालो. त्यापैको १४६ जनावरे मृत्युमुखी पडलो. मृत्युमुखी पडलेल्या जनावरांमध्ये घटसर्पामुळे ८५ तर आंत्राविषारामुळे ६१ जनावरे मेली.

५१. शासकीय दुग्धयोजनेमार्फत कणकवली येथील केंद्रावर संकलीत केलेल्या दुधावर प्रक्रिया करून जिल्हयामध्ये व जिल्हयाबाहेर दुध वितरण केले जाते. १९८६-८७ मध्ये १५५१ हजार लिटर दुध संकलन झाले. संकलन व वितरण केलेल्या दुधाचो किंमत ५०३४.४ हजार रुपये होतो. गतवर्षाचा विचार करता चालू वर्षी दुध संकलनामध्ये घट झालेलो आहे.

७. मत्स्यव्यवसाय

५२. सिंधुदूर्ग हा सागरी जिल्हा असल्याने गोडया पाण्यातील मत्स्यव्यवसायापेक्षा येथो सागरी मत्स्यव्यवसायाला जास्त वाव आहे. जिल्हयाचो सागरी किना-याचो लांबो अंदाजे १२१ कि.मो. आहे. जिल्हयातील वेंगुर्ला, मालवण व देवगड या तालुक्यानां सागरी किनारा आहे. १९८६-८७ मध्ये २४१६९ मे.टन मत्स्योत्पादन झाले व त्यापासून उत्पादकाना ९६७.६८ लाख रुपये उत्पन्न मिळाले.

५३. जिल्हयामध्ये गोडया पाण्यातील मच्छिमारी अत्यल्प आहे. १९८६-८७ मध्ये फक्त १२ टन मासे गोडया पाण्यातून पकडण्यात आले व त्यापासून उत्पादकाना ७२००० रुपये उत्पन्न मिळाले.

५४. १९८६-८७ मध्ये अवरुद्ध पाण्यातील मत्स्यसंवर्धन योजनेखालो ४.९५ लाख मत्स्यबीज सोडण्यात आले. १९८६-८७ मध्ये जिल्हया-तील ३३ मच्छिमार धारकांना व्यवसायासाठी कर्जे दिली. मच्छिमार सहकारी संस्थांचा विकास करण्यासाठी दोन संस्थांना सहाय्य करण्यात आले. तसेच मच्छिमार युवकाना व्यवसायासाठी प्रशिक्षण दिले जाते.

८. वीज

५५. १९८६-८७ अखेर जिल्ह्यातील ७०६ गावापैकी ६४९ गावांचे व वारही नागरी भागांचे विद्युतीकरण झालेले होते. जिल्ह्यातील ग्रामीण व नागरी भागातील विद्युतीकरणाचे प्रमाण अनुक्रमे ९२.० टक्के व १०० टक्के होते.

विजेचा वापर

५६. १९८६-८७ मध्ये जिल्ह्यातील एकूण विजेचा वापर ४७०१८ हजार किलोवॉट तास होता. यापैकी घरगुती वापरासाठी ४०.७ टक्के, व्यापारी कामासाठी ७.७ टक्के, उद्योगाकरिता ४५.७ टक्के, शेतीसाठी ३.६ टक्के, सार्वजनिक दिवाबत्ती व इतर यासाठी २.३ टक्के याप्रमाणे वीज वापरण्यात आली. १९८५-८६ पेक्षा १९८६-८७ मध्ये वीज वापरामध्ये १.४ टक्क्यांनी वाढ झाली. या जिल्ह्यामध्ये महाराष्ट्र राज्य विद्युत मंडळामार्फत वीज पुरवठा केला जातो. सन १९८६-८७ या वर्षात वीज पुरवठ्यामुळे एकूण उत्पन्न रू.१९६३९ हजार मिळाले होते. एकूण उत्पादनापैकी ५२.९ टक्के उत्पन्न घरगुती वापरासाठी पुरविलेल्या विजेपासून मिळालेले होते.

९. खनिजे व उद्योग

५७. जिल्ह्यातील दक्षिण पट्ट्यातील सागर किनाऱ्यावर तसेच कुडाळ, कणकवली येथे खनिज साठ्याचे प्रमाण भरपूर आहे. रत्नागिरी, सिंधुदुर्ग प्रादेशिक नियोजन मंडळाने तयार केलेल्या (Regional Plan Ratnagiri - Sindhudurg Resource Region) या अहवालामध्ये जिल्ह्यातील उपलब्ध खनिजे व त्यांची उपलब्धता या बाबतची माहिती दिलेली आहे.

५८. जिल्ह्यामध्ये रेडी, ता. वेंगुर्ला येथे लोह खनिजाचा साठा मुबलक प्रमाणात आहे. राज्यातील कोणत्याही भागापेक्षा या परिसरातील जमिनीमध्ये लोखंडाचा अंश ६० टक्क्याहून जास्त आहे. रेडी येथील खाणीमधून अशुध्द स्वरूपातील लोह खनिजाची निर्यात रूमानिया या देशात केली जाते. रेडी येथे अंदाजे ४८ दशलक्ष टन उपयोगी पडण्याजोगे लोखंड मिळू शकेल असा अंदाज वरील अहवालात दिला आहे.

५९. जिल्हयात आढळणारा आगळा एक महत्वाचा खनिज पदार्थ म्हणजे इलेमेनाईट धातू हा किना-यावर मुबलक ठिकाणी सापडतो. तसेच कणकवली तालुक्यामध्ये क्रोमाईट धातूचे प्रमाण मुबलक आहे. समुद्र किना-यावर आढळणा-या वाळू व सिलीकाचे साठे हे जिल्हयात मुबलक प्रमाणावर आढळतात. जिल्हयामध्ये इमारतीच्या उपयुक्त जांभ्या दगडांच्या खाणी भरपूर आहेत. जांभ्या दगडाच्या मुबलक उपलब्धतेमुळे इमारतीसाठी सर्रासपणे जांभ्या दगडांचाच वापर केला जातो.

६०. सावंतवाडी तालुक्यातील आंबोली येथे बॉक्साईडचा साठा मुबलक आहे. यातील ॲल्युमिनियमचे प्रमाण ४५ ते ६० टक्यापर्यंत आहे. कणकवली तालुक्यामध्ये क्रोमाईट खनिज सापडते.

६१. जिल्हयामध्ये मॅगेनीज खनिजाचे साठे फोंडा, सासोली, नेतर्डे डिंगणे या ठिकाणी आढळतात. कणकवली तालुक्यामध्ये नाटळ ते भिरवंडे परिसरात व कुडाळ तालुक्यातील कडावल जवळ अभ्रकाचे साठे आहेत. त्याचप्रमाणे मालवण तालुक्यामध्ये कुंभारमाठ जवळ चिकणमातीचे साठे आढळतात. विविध घाटकांचा चिवळा गेरू किना-यावरील डोंगरात ब-याच ठिकाणी आढळतो. गेरू हा लोहमय वाळूचा दगड व पाटयाचा दगड यापासून तयार होतो. व त्यापासून खनिज रंगद्रवे तयार करतात.

६२. जिल्हयातील खनिज उत्पादनाची आकडेवारी उपलब्ध होऊ शकली नाही. तथापि या कार्यालयामार्फत काही ठराविक खनिजांचे दर गोळा केले जातात. त्या आधारे १९८६-८७ मधील अशुध्द लोह खनिजाचा दर १२५ रुपये प्रति मॅट्रिक टन होता. त्याचप्रमाणे फेल्सपर १६० रुपये प्रति मॅट्रिकटन, तिलिका १३० रुपये प्रति मे.टन वाळू ३० रुपये ब्रास, इमारतीचा दगड ४० ते ४२ रुपये मे.टन, मुरूम २० रुपये प्रति मॅट्रिकटन याप्रमाणे दर होते.

उद्योग व औद्योगिक वसाहती

६३. जिल्हयामध्ये कुडाळ, कणकवली व माजगांव [ता. सावंतवाडी] येथे औद्योगिक वसाहती आहेत. कुडाळ येथे महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळाने १२७ हेक्टर जमीन संपादित केलेली आहे. ही जमीन लघु तसेच मोठया उद्योगसमुहाला उपलब्ध करून देणेत आली आहे.

६४. कुडाळ येथील औद्योगिक वसाहतीमध्ये डब्ल्यू. जी. फोर्ज ॲण्ड अलाईट इंडस्ट्रीज, तुंदर इंडस्ट्रीज, पायडर मेटल, राधा पेपर मिल्स, कोंकण गॅस इत्यादी कारखाने आहेत. यापैकी राधा पेपरचे कारखाने बंद आहेत. गोपुरी तालुका कणकवली या ग्रामोद्योग केंद्रात साबण, हात कागद व जनावरांचे कातडे कमावण्याचे कुटिरोद्योग चालू आहेत.

६५. सिंधुदुर्ग जिल्ह्यामध्ये वेंगुर्ला, मालवण व कुडाळ तालुक्यात काजूचे कारखाने आहेत. येथील काजूला राष्ट्रीय बाजारपेठेत चांगली मागणी आहे. सुप्रसिध्द काजू फेणी या मद्याचे उत्पादन इन्सुली [तालुका सावंतवाडी] येथील साऊथ कोंकण डिस्टिलरीमध्ये होते. लाकडाचे खोळगे करण्याचे कुटीरोद्योग सावंतवाडी भागात आहेत. वेंगुर्ला येथे नारळाच्या झाडापासून केरसुण्या, काथ्याच्या वस्तू व इतर आकर्षक वस्तू तयार करण्याचे कुटीरोद्योग आहेत.

१०. <u>दळणवळण</u>

६६. सिंधुदुर्ग जिल्ह्यात रस्ते व समुद्रमार्ग दळणवळणासाठी उपयोगात आणला जातो. पूर्वी विजयदुर्ग, देवगड, मालवण, वेंगुर्ला अशा बंदरातून बोट वहातूक चालू होती. मुंबई - पणजी[गोवा] मार्गाने बोटीची वहातूक चालू होती व सिंधुदुर्ग जिल्ह्यातील उपरोक्त बंदरे बोट घेत असे परंतु सध्या ही बंदरे चालू नसून देवगड, विजयदुर्ग बंदराचा बोट वहातूकीसाठी उपयोग केला जातो.

जिल्ह्यातील रस्त्यांची देखभाल महाराष्ट्र शासन व जिल्हा परिषद यांच्या बांधकाम खात्यामार्फत केली जाते. १९८६-८७ या वर्षी जिल्ह्यात ३२१०.९२ कि.मी. लांबीचे रस्ते होते. त्यापैकी महाराष्ट्र शासनाच्या सार्वजनिक बांधकाम खात्याच्या अखत्यारीत ९९१.२७ कि.मी. व जिल्हा परिषदेच्या अखत्यारीत २२१९.६५ कि.मी. लांबीचे रस्ते होते. जिल्ह्यातील रस्त्यांचे पृष्ठभागानुसार वर्गीकरण सिमेंट काँक्रीट २१.२२ कि.मी., डांबरी १००७.१५ कि.मी., खडीचे परंतु पक्के रस्ते १३४२.७३ कि.मी. व इतर ८३२.८२ कि.मी. याप्रमाणे होते.

६७. जिल्ह्यातील प्रवासी वहातूक महाराष्ट्र राज्य मार्ग परिवहन महामंडळामार्फत केली जाते. १९८६-८७ अखेरीस जिल्ह्यामध्ये ५४२ मार्गावर २८३ बसगाड्या धावत होत्या. बसवहातूकीमुळे मिळालेले

उत्पन्न ११४९.७७ लाख रुपये होते. १९८५-८६ पेक्षा हे उत्पन्न १०.७ टक्यानी जास्त आहे. १९८६-८७ या वर्षी दर दरडोईमागे मिळालेले सरासरी उत्पन्न ३.०० रुपये होते.

६८. १९८६-८७ या वर्षी वापरात असलेल्या मोटार वाहनांची संख्या ६७८५ होती, यापैकी मोटारसायकली/स्कुटर्स ४०५४ जीप किंवा तत्सम मोटारी ७३६, आटोरिक्षा ६७१, टॅक्सी ९ व राज्य परिवहन महामंडळाच्या २६९ मोटारी होत्या. डिझेलवर चालणारी सार्वजनिक व खाजगी वाहने ९०८, पेट्रोलवर चालणारी खाजगी व सार्वजनिक वाहने ८, रुग्णवाहिका ४, जीपव्यतिरिक्त ३६ व इतर वाहने ९० होती.

डाक व तार

६९. १९८६-८७ या वर्षी जिल्ह्यातील २२२ गावांना डाक व तार कार्यालयाची सुविधा उपलब्ध असून जिल्ह्यामध्ये एकूण ३४१ डाक कार्यालये व ३४ तार कार्यालये कार्यरत होती. जिल्ह्यामध्ये ज्या डाक कार्यालयामध्ये तारेचे यंत्र नाही परंतु दूरध्वनीवर तारा बुक केल्या जातात अशा तार-घरांची संख्या ६२ होती. एक लाख लोकसंख्येमागे जिल्ह्यातील डाकघरांची संख्या ४४ होती.

दूरध्वनी

७०. १९८६-८७ मध्ये जिल्ह्यात १९२२ दूरध्वनी, ग्राहक होते व ही संख्या १९८५-८६ मधील ग्राहक संख्येपेक्षा १४.५ टक्यानी जास्त होती. सर्वात जास्त दूरध्वनी ग्राहकांची संख्या सावंतवाडी तालुक्यात होती. त्यानंतर कुडाळ व कणकवली या तालुक्याचा क्रम लागतो.

११. रोजगार

७१. १९८६ मध्ये नोंदणी झालेल्या कारखान्यांची संख्या अनुक्रमे १२७ होती. याच वर्षी बंद असलेल्या कारखान्यांची संख्या १५ होती. चालू कारखान्यामधील कामगारांची संख्या २९०४ होती ही गतवर्षी-पेक्षा ६३ नी वाढलेली आहे.

खाजगी व सार्वजनिक क्षेत्रातील रोजगार

७२. १९८६-८७ साली खाजगी व शासकीय, निमशासकीय क्षेत्रातील एकूण कर्मचा-यांची संख्या २३६२६ होती. गेल्या वर्षापेक्षा

हो १.३ टक्यानो वाढलेलो आहे. यापैकी खाजगी क्षेत्रातील कर्मचा-यांची संख्या २६.८ टक्के होती.

७३. उद्योगधंद्याच्या वर्गीकरणानुसार १९८६-८७ या वर्षी कृषि उद्योगामध्ये ४.० टक्के, खाणकाम उद्योगामध्ये ३.८ टक्के, वस्तु निर्माण क्षेत्रामध्ये ८.३ टक्के, विजनिर्मिती, गॅस, पाणी व सांड-पाणी उद्योग ३.२ टक्के, परिवहन, गुदामे आणि दळणवळण १६.८ टक्के, सामुहिक, सामाजिक व व्यक्तिगत सेवा ५५.५ टक्के व इतर ८.४ टक्के याप्रमाणे विविध उद्योगामध्ये कर्मचा-यांची संख्या होती.

७४. १९८६-८७ या वर्षी खाजगी व सार्वजनिक क्षेत्रातील कर्मचा-यांच्या संख्येचा विचार करता एकूण कर्मचा-यांच्या २६.८ टक्के कर्मचारी खाजगी क्षेत्रात तर उर्वरित सार्वजनिक क्षेत्रात काम करत होते. खाजगी क्षेत्रातील ६३२२ कर्मचा-यांपैकी उद्योगधंद्याच्या वर्गीकरणानुसार कृषि उद्योग निरंक, खाणकाम १४.३ टक्के, वस्तुनिर्माण २७.६ टक्के, वि-तपुरवठा, विमा व्यवसाय, स्थावर मालम-ता आणि व्यापार विषयक सेवा ६.३ टक्के, सामुहिक सामाजिक सेवा ४९.७ टक्के व इतर २.१ टक्के याप्रमाणे कर्मचारी संख्या होती. सार्वजनिक क्षेत्रातील एकूण १७३०४ कर्मचा-यांपैकी कृषिउद्योग ५.४ टक्के, वस्तुनिर्माण १.२ टक्के, विज निर्मिती, गॅस पाणी व सांडपाणी उद्योग ४.४ टक्के, बांधकाम ३.७ टक्के, परिवहन गुदामे आणि दळणवळण २२.९ टक्के, वि-तपुरवठा, विमा स्थावर मालम-ता व व्यापार विषयक सेवा ४.६ टक्के आणि सामुहिक सामाजिक व व्यक्तिगत सेवा ५७.८ टक्के याप्रमाणे कर्मचारी संख्या होती.

सेवायोजन कार्यालय

७५. १९८६-८७ मध्ये खाजगी व सार्वजनिक क्षेत्रामध्ये रोजगार पुरविलेल्या उमेदवारांची संख्या २७२ होती. १९८६-८७ मध्ये रोजगार पुरविलेल्या २७२ उमेदवारांपैकी खाजगी व सार्वजनिक क्षेत्रात रोजगार पुरविलेल्या उमेदवारांची टक्केवारी अनुक्रमे ११.० व ८९.० होती. राष्ट्रीय वर्गीकरणानुसार रोजगार पुरविलेल्या कामगारांची टक्केवारी व्यवसायिक, तांत्रिक आणि संबंधितक्षेत्रातील कामगार १९.१, प्रशासकीय, शासकीय आणि व्यवस्थापकीय कामगार निरंक, लेखाविषयक व तत्संबंधीचे कामगार २१.०, शेतकरी, मत्स्यव्यवसाय इत्यादी ८.५, वहातूक दळणवळण ७.७ व इतर ४३.७ याप्रमाणे होती.

तंत्रशिक्षण संस्था

७६. जिल्ह्यामध्ये सावंतवाडी येथे औद्योगिक प्रशिक्षण संस्था आहे. या प्रशिक्षण संस्थेमध्ये काही एक वर्षा व काही दोन वर्षे मुदतीचे धंदेवाईक व्यवसाय शिक्षण दिले जाते. या संस्थेमधील एक वर्षा मुदतीचे प्रत्येकी ३२ विद्यार्थी क्षमतेचे सुतारकाम, शिवणकाम, [Tailoring], हस्तजोडाईकार, मुद्रणयंत्रचालक व दोन वर्षे मुदतीचे प्रत्येकी १६ विद्यार्थी क्षमतेचे जोडारी, विजतंत्री, तारतंत्री हे व्यवसाईक शिक्षण देणारे अभ्यासक्रम होते. या औद्योगिक तंत्र-प्रशिक्षण संस्थेमध्ये १९८६-८७ या वर्षी १९६ विद्यार्थी होते. तर १९ निर्देशक होते.

७७. जिल्ह्यामध्ये मालवण येथे ऑक्टोबर १९८५ पासून शासकीय तंत्रनिकेतन सुरु झाले आहे. या ठिकाणी स्थापत्य अभियांत्रिकी व यंत्र अभियांत्रिकी पदविका अभ्यासक्रमाची सोय आहे.

१२. आर्थिकगणना १९८०

७८. रत्नागिरी जिल्ह्याच्या विभाजनापूर्वी सन १९८० साली आर्थिक गणना घेण्यात आली. त्यामुळे या आर्थिक गणनेतील आकडे-वारी जुन्या रत्नागिरीची आहे. आर्थिक गणनेत बिगर शेती व निवडक शेती उद्योगाची माहिती गोळा करण्यात आली. तथापि या समालोचनामध्ये केवळ बिगरशेती उद्योगाचीच माहिती विचारात घेतलेली आहे.

बिगर कृषि आस्थापना

७९. जुन्या रत्नागिरी जिल्ह्यामध्ये बिगर शेती उद्योगांची संख्या ५२३३० होती. यापैकी ८२.८ टक्के आस्थापना ग्रामीण भागात तर केवळ १७.२ टक्के आस्थापना नागरी भागात होत्या. एकूण आस्था-पनापैकी ३९००१ [७४.५ टक्के] आस्थापना खाजगी, १२३८५[२३.७ टक्के] सार्वजनिक तर केवळ ९४४ [१.८ टक्के] आस्थापना सहकारी क्षेत्रात होत्या. एकूण आस्थापनेच्या ६.१५ टक्के आस्थापनाचे मालक अनुसूचित जातीचे तर केवळ ०.७४ टक्के आस्थापनाचे मालक अनुसूचित जमातीचे होते. एकूण आस्थापनापैकी १६.८५ टक्के आस्था-पना छप्पर विरहित जागेत कार्यान्वित होत्या तर केवळ १६.१२ टक्के आस्थापनामध्ये उत्पादनासाठी विजेचा वापर करण्यात येत होता.

कामगार

८०. बिगर शेतो आस्थापनामध्ये एकूण १२७४०४ कामगार काम करीत होते. यापैकी ७२.६ टक्के कामगार ग्रामीण भागात तर २७.४ टक्के कामगार नागरी भागात काम करीत होते. एकूण कामगारापैकी वेतनावर काम करणारे कामगार ७९९९८ [६२.८ टक्के] होते.

जिल्ह्यातील प्रत्येक आस्थापनेत सरासरी चार कामगार काम करीत होते. ग्रामीण व नागरी भागातील आस्थापनेकरीता हेच प्रमाण अनुक्रमे तीन व आठ होते.

उद्योग गट

८१. प्रत्येक उद्योग गटात किती कामगार काम करीत होते याची गटवार माहिती तक्ता ५.१२ मध्ये देण्यात आली आहे. एकूण ५२३३० आस्थापनापैकी उत्पादन व दुरुस्ती सेवा या उद्योग गटात सर्वाधिक म्हणजे १६२८४[३१.१ टक्के] आस्थापना होत्या व त्यामध्ये एकूण कामगारापैकी ३५४४५ [२७.८ टक्के] कामगार काम करीत होते. सामुहिक सामाजिक व व्यक्तिगत सेवा या उद्योग गटाचा दुसरा क्रमांक लागतो. त्यामध्ये एकूण १६०८६ [३०.७ टक्के] आस्थापना होत्या. कामगार संस्थेच्या दृष्टीकोनातून विचार केल्यास या आस्थापनांमध्ये सर्वाधिक म्हणजे ४५३१७ [३५.६ टक्के] कामगार काम करीत होते. घाऊक व किरकोळ व्यापार या उद्योग गटात १२९८६ [२४.८ टक्के] आस्थापना होत्या. या आस्थापनांमध्ये २२२५७ [१७.५ टक्के] कामगार काम करीत होते. उर्वरित उद्योग गटातील एकूण ६९७४ [१३.३ टक्के] आस्थापनामध्ये २४३८५ [१९.१ टक्के] कामगार गुंतलेले होते.

सहकार क्षेत्रातील आस्थापना

८२. सहकारी क्षेत्रात असलेल्या एकूण ९४४ आस्थापनांपैकी ७८२ [८२.८ टक्के] आस्थापना ग्रामीण भागात तर १६२ [१७.२ टक्के] आस्थापना नागरी भागात होत्या. एकूण आस्थापनांपैकी केवळ ३४ [४ टक्के] आस्थापना विजेवर चालणाऱ्या होत्या. एकूण कामगारांपैकी सहकारी क्षेत्रातील आस्थापनामध्ये केवळ ३६४६ [२.९ टक्के] कामगार काम करीत होते.

८३. सहकारी क्षेत्रातील एकूण ९४४ आस्थापनांपैकी घाऊक व किरकोळ व्यापारी या उद्योग गटात सर्वाधिक म्हणजे ३८९ [४१.२ टक्के] आस्थापना होत्या व त्यात एकूण कामगारांपैकी ६७४ [१८.५ टक्के] कामगार गुंतलेले होते. अर्थपुरवठा, विमा, मालमत्ता व इतर व्यावसायिक सेवा या उद्योग गटात २५७ [२७.२ टक्के] आस्थापना होत्या. तथापि या आस्थापनांमध्ये सर्वाधिक म्हणजे ९४० [२५.८ टक्के] कामगार गुंतलेले होते. सामुहिक, सामाजिक व व्यक्तिगत सेवा या उद्योग गटातील २०२ [२१.४ टक्के] आस्थापनांमध्ये ७०४ [१९.३ टक्के] कामगार काम करीत होते. बांधकाम या उद्योग गटात सहकारी क्षेत्रात एकही आस्थापना नव्हती.

१३. सहकार

सहकारी संस्था

८४. १९८६-८७ मध्ये एकूण ४६६ सहकारी संस्था होत्या व त्यांचे सभासद संख्या १७२००४ होती.

८५. जिल्ह्यातील एकूण सहकारी संस्थांपैकी २६२ [५६ टक्के] पत संस्था आणि २०४ [४४ टक्के] इतर प्रकारच्या संस्था होत्या.

८६. सहकारी संस्थांमधील एकूण सभासद संख्या १७२००४ होती. त्यापैकी कृषि पतसंस्थेतील सभासदांची संख्या १०४०४१ होती. ही एकूण सभासद संख्येच्या ६०.५ टक्के होती. उर्वरित ३९.५ टक्क्यांमध्ये विणकरांच्या संस्थांचे ०.१ टक्के, औद्योगिक सहकारी संस्थांचे ५.९ टक्के, दुग्ध उत्पादन संस्थांचे ५.१ टक्के, मत्स्यव्यवसाय सहकारी संस्थांचे ४.७ टक्के, जंगल कामगार सहकारी संस्थांचे ०.५ टक्के ग्राहक भांडाराचे ४.६ टक्के, कामगार कंत्राट सहकारी संस्थांचे ०.६ टक्के, गृहनिर्माण संस्थांचे ०.४ टक्के, व इतर संस्थांचे १७.६ टक्के याप्रमाणे सभासद होते.

८७. सहकारी बँकेमार्फत १९८६-८७ मध्ये २०२ लाख रुपयांचे अल्प मुदतीचे व ९६ लाख रुपयांचे मध्यम मुदतीचे कर्जे दिली. १९८६-८७ अखेर १३५ लाख रुपयांचे अल्प मुदतीच्या व २३ लाख रुपयांचे मध्यम मुदतीच्या कर्जाची थकबाकी होती.

१४. बँका

